सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भः रासेयो/२०२३-२४/४०६ दि.१०/१०/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय : ऐतिहासीक स्थळे दत्तक योजना उपक्रमांचे ऑनलाईन प्रस्ताव पुनःश्च/नव्याने पाठविणे बाबत...**
**संदर्भ : रासेयो/२०२३-२४/३०६, दि.०४/०९/२०२३**

महोदय,

वरील संदर्भीय पत्रान्वये सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध कार्यशाळां आयोजनाकरिता महाविद्यालयांमार्फत प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. त्यानुसार महाविद्यालयांमार्फत ऑनलाईन स्वरूपात आलेल्या प्रस्तावांची छाननी मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार घटीत समिती मार्फत करण्यात आली.

यामध्ये समितीने ऐतिहासीक स्थळे दत्तक योजना या उपक्रमांचे प्रस्ताव विस्तृत स्वरूपात, पुरेशी माहिती उपलब्ध नसल्यामुळे पुनःश्च/नव्याने मागवण्याबाबत सूचित केले. तरी ज्या महाविद्यालयांना **ऐतिहासीक स्थळे दत्तक योजना** : ऐतिहासीक स्थळ संवर्धन व संगोपन, स्वच्छता अभियान, जनजागृतीपर कार्यशाळा/शिबिरे आयोजित करावयाची आहेत अशा महाविद्यालयांनी उपक्रमांचे प्रस्ताव पुनःश्च/नव्याने ऑनलाईन स्वरूपात दि. **२० ऑक्टोबर, २०२३ पर्यंत** www.bcud.unipune.ac.in→login→menu→nsss→workshop proposal या लिंकवर भरण्यात यावे. प्रस्ताव भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून त्यासोबत शिबिराची सविस्तर माहिती वेगळ्या पानावर टंकलिखित करून प्रस्तावासह एकत्रित स्कॅन कॉपी पीडीएफ स्वरूपात तात्काळ अपालोड करण्यात यावी.

महाविद्यालयांनी यापूर्वी प्रस्ताव सादर केले असल्यास पुन्हा प्रस्ताव सादर करणे अनिवार्य आहे.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**